MHAU070009222025

## विशेष दिवाणी दावा क्रमांक १६/२०२५
## निशाणी क्रमांक २७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज लेखी जबाब दाखल करण्यास झालेला एक वर्ष १० महिने विलंब माफ होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२ प्रतिवादी क्र. १ व २ यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरण प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या लेखी जबाबासाठी होते. मात्र, प्रस्तुतचे पक्ररण हे मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर वैजापुर येथुन स्थलांतरीत होऊन ते मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापुर येथे स्थलांतरीत झाल्यानंतर प्रकरणात प्रतिवादी यांना पुन्हा सदर प्रकरणाची नोटीस प्राप्त न झाल्याने प्रतिवादी यांचा प्रकरणाबाबत माहिती मिळु न शकल्याने तसेच प्रकरणातील प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुध्द शिल्लेगांव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाल्यामुळे ते वकीलांना भेटु शकले नाही व प्रकरणाबददलची माहिती घेऊ शकले नाही. त्यामुळे प्रतिवादींना प्रकरणात लेखी म्हणणे दाखल करण्यास एक वर्ष व १० दिवसाचा विलंब झालेला आहे. सदरचे प्रकरण हे कराराची पुर्तता करुन मिळणे बाबत व मनाई हुकूम मिळण्याकामी असल्याने सदर आदेश बाजुस सारुन न घेतल्यास प्रतिवादींचे म्हणणे पटलावर न आल्याने त्यांचे नुकसान होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब सदर विलंब माफ होऊन मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदाराने नि.क्र.२९ अन्वये सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की, एक वर्ष १० दिवसाच्या विलंबाचे योग्य ते कारण नमुद केलेले नाही. अर्जात नमुद केलेले कारण योग्य नाही. विहित मुदतीत लेखी जबाब दाखल करण्यास सामनेवाल्याने मुददामहुन उशीर केलेला आहे. सबब खर्चासह अर्ज फेटाळण्याची

विनंती अर्जदाराने केली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणाच्या ई फाईलींगच्या अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सामनेवाले यांना दिनांक १३/०६/२०२४ रोजी प्रकरणात समन्स प्राप्त झालयानंतर प्रतिवादी दिनांक १५.०६.२०२४ रोजी सदर प्रकरणात हजर झाले. त्यापासुन पुढे ९० दिवसात म्हणजेच दि. १५.०९.२०२४ पर्यंत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक होते. सदर अर्ज ते दाव्यात हजर झाल्यापासुन एक वर्ष १० दिवसानंतर दाखल केला आहे. अर्जात नमूद कारणांच्या पुष्ठयर्थ कोणताही पुरावा दाखल करण्यात आलेला नाही. सबब विलंबासाठी अर्जात नमुद केलेले कारण योग्य नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम १ अन्वये सामनेवाल्यांनी लेखी जबाब त्यास समन्स प्राप्त झाले पासून जास्तीत जास्त ९० दिवसांपर्यत दाखल करणे आवश्यक आहे. मात्र सामनेवालेचे म्हणणे विचारात घेतल्या शिवाय अर्जाचा निर्णय गुणावगुणावर होणार नाही. सबब सामनेवालेला संधी म्हणून लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे योग्य होईल. विलंबांचे योग्य ते स्पष्टीकरण पटलावर नसल्याने तसेच प्रकरण अंतिम युक्तीवादावर असल्याने प्रतिवादीस खालील प्रमाणे जाद कॉस्ट करणे अचित होईल. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

आदेश

१. अर्ज रक्कम रुपये २५००/– कॉस्ट वर मंजुर करण्यात येतो.

२. सदर कॉस्ट अर्जदाराने वादी यांना प्रदान करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2025.10.15 12:28:31 +0000

**दिनांक : १४.०९.२०२५.**

**(रोहीत नं. पाठक )**
**सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर),**
**गंगापुर.**

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file Judgment are same, word to word as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Balu Ashruba AgeStenographer Grade 2 |
| Court | : CJSD Court, Gangapur. |
| Judgment date | : 14/10/2025 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 14/10/2025 |
| Judgment uploaded on | : 15/10/2025 |